# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ४७९/पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- १३/०९/२०१८

## "कोंढा येथिल परवाणा धारक दुकाणातुन अवैध चिल्लर दारू विक्रत्यांना दारूचा साठा पुरविणारे वाहन पकडले"

मा. पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू यांचे रेड पथकाची कार्यवाही

पोलीस ठाणे अडयाळ :– अंतर्गत ग्राम कोंढा येथिल बाजार चौकात असलेली सरकार मान्य चिल्लर देशी दारू दुकाणातुन दिनांक १३.०९.२०१८ ला गणेश चतुर्थी निमीत्ताने सर्व परवाणा देशी दारू दुकाण व बियर बार बंद असल्याने बंद काळात दारू विक्री करीता ग्राम नेवगाव, आसगाव येथे अवैध चिल्लर दारू विक्रेत्यांना दिनांक १२.०९.२०१८ रोजी दुपारीचे सुमारास मारोती व्हॅन गाडीने नामे योगेश जुंबळे रा. आसगाव हा देशी दारूचा पुरवठा करणार असल्याची गुप्त बातमी मिळाले वरून मा. पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू यांचे मार्गदर्शनात जिल्हा रेड पथकाचे प्रमुख पोउपनि जितेंद्र आडोळे यांनी आपले सहकार्यासह योग्य सापळा रचुन छापा टाकला असता एक मारोती व्हॅन गाडी, देशी दारू व बियरच्या पेटया असा एकुण १,८६,८८० रूपयाचे मुद्देमाल जप्त करून आरोपींता विरूध्द कार्यवाही केली.

दिनांक १२.०९.२०१८ ला गणेश चतुर्थीचे निमीत्ताने कोंढा येथुन बंदकाळात विक्री करीता अवैध दारू पुरवाठा करण्यात येत असल्याबाबत मिळालेल्या गुप्त माहितीचे आधारे ग्राम भावड परिसरात नवेगाव रोडवर सायंकाळी ५.०० वा. सुमारास नाकाबंदी केली असता कोंढा गावाकडुन पांढऱ्या रंगाची मारोती व्हॅन गाडी क्रमांक एम.एच. ३१ सि. आर. ९५९७ आल्याने सदर वाहनास थांबवुन तपासणी केली असता वाहनात १८० एम.एल. देशी दारूने भरलेल्या ६ पेटया प्रत्येक पेटीत ४८ पव्वे व ६५० एम.एल. किंगफिसर बियर व टुबोअर्ग बियर ने भरलेल्या ४ पेटया प्रत्येक पेटीत १२ बॉटल तसेच ३३० एम.एल. किंगफिसर बियर व टुबोअर्ग बियर ने भरलेल्या २ पेटया प्रत्येक पेटीत २४ बॉटल वाहनात भरून अवैधरित्या वाहतुक करतांना मिळुन आल्याने दारू व वाहन आसा एकुण १,८६,८८० रूपयाचा माल जप्त करून वाहनात मिळुन आलेला वाहनाचा चालक योगेश दयाराम जुंबळे २)शुभम देवीदास पिल्लेवान यांना माला बाबत विचारणा केली असता सदर माल कोंढा येथिल सरकार मान्य देशी दारू दुकाणातुन दुकाणाची देखरेख करणारा तुलशी वामनराव पडोळे रा. आसगाव ता. पवनी यांचे सांगणे वरून सदरची दारू विना पास परवाणा घेवुन नवेगाव येथे अवैध चिल्लर दारू विक्रता अंकुश गोस्वामी यास ६ देशी दारूच्या पेटया देवुन उर्वरीत दारू मालक शेखर वामनराव पडोळे यांची आसगाव येथे देशी दारू दुकाण असुन दिनांक १३.०९.२०१८ ला गणेश चतुर्थी निमीत्त बंद आल्याने बंद काळात विक्री करीता घेवुन जात असल्याचे सांगीतले वरून प्रदिप पवारा रा. अडयाळ यांचे नावे असलेली कोंढा येथिल देशी दारू दुकाणातील माल देणारा नौकर चंदु कोडापे यास ताब्यात घेवनु विचारपुस केली वरून सदर माल देशी दारू दुकाणातुन शेखर पडोळे यांनी योगेश जुंबळे यास माल देण्याबाबत सांगीतल्याने माल दिल्याचे कबुल केले वरून पोउपनि जितेंद्र आडोळे, जिल्हा रेड पथक, भंडारा यांनी वाहनाचे चालक आरोपी नामे योगेश दयाराम जुंबळे, वय ३० वर्ष रा. आसगाव ता. पवनी जि. भंडारा २)शुभम देवीदास पिल्लेवान, वय २० वर्षे रा. पालेपंढरी ता.लाखांदुर जि.भंडारा ३) चंदु देवराम कोडापे, वय ३६

वर्षे रा.वार्ड क्रमांक ५ अडयाळ, ता.पवनी जि.भंडारा ४) शेखर वामनराव पडोळे, वय ३४ वर्षे रा. आसगाव ५) तुलशी वामनराव पडोळे, वय ३२ वर्षे रा. आसगाव ६) प्रदीप पवार रा. अडयाळ ७) अंकुश गोस्वामी रा. नवेगाव तसेच मारोती व्हॅन गाडी क्रमांक एम.एच. ३१ सि. आर. ९५९७ चा मालक यांनी मिळुन संगनमत व कट करून सरकार मान्य देशी दारू दुकान परवाण्याचे उल्लंघन करून अवैध रित्या देशी दारू व बियरची वाहतुक करीतांना मिळुन आल्याने त्यांचे वर कार्यवाही करीता जप्त मुद्देमाल व ताब्यातील आरोपीस पोलीस ठाणे अडयाळ येथे सादर करून तक्रार दिल्याने नमुद आरोपींता विरूध्द कलम ६५(अ),७७(अ),८२(१)(२),८३(ब) महा. दारुबंदी कायदया गुन्हा नोंद करून गुन्हयाचा पुढील तपास अडयाळ पोलीस करीत आहेत.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक, श्रीमती विनीता साहू यांचे मार्गदर्शनात जिल्हा रेड पथक प्रमुख पोलीस उप निरीक्षक जितेंद्र आडोळे, सहा. फौजदार अश्विनकुमार मेहर, पोलीस हवालदार रुपचंद जांगळे, पोलीस नाईक प्रदीप डाहारे, विनोद शिवणकर, सचिन गाढवे यांनी केली आहे.

**(जितेद्रं के आडोळे)**
**पोलीस उपनिरीक्षक**
**जनसंपर्क अधिकारी**
**संपर्क क्र. ९४०३१०९७२०**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती
दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.